महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २९ वे | दिनांक : २०/०१/२०२६ | वार : मंगळवार

## मुंबई महापालिकेत ठाकरेंचाच महापौर होणार? २ हुकमी एक्के खिशात



**मुंबई** : महापौर पदाच्या आरक्षण सोडतीत योग्य पत्ते पडले तर मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचाच उमेदवार महापौर होईल असा नवा दावा केला जात आहेत. या प्रकरणी कोणत्याही पक्षाकडे नाहीत असे दोन हुकमी एक्के ठाकरे गटाकडे आहेत. त्यामुळे या चर्चेला ऊत आला आहे. उद्धव ठाकरे यांनी २ दिवसांपूर्वीच देवाची इच्छा असेल तर आपलाच महापौर होईल हे विधान केले होते हे विशेष.

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत भाजपला सर्वाधिक ८९ जागा मिळाल्या आहेत. तर ठाकरे बंधूंना ७१ जागा मिळाल्या आहेत. सत्ताधारी शिवसेना २९ जागा जिंकत थेट तिसऱ्या क्रमांकावर फेकल्या गेली आहे. आता निवडणुकीनंतर फोडाफोडी होण्याच्या भीतीने एकनाथ शिंदेंनी शिवसेनेच्या सर्व नगरसेवकांना मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलात हलवले आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईत उद्धव ठाकरेंचाच महापौर होण्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

येत्या २२ जानेवारीला महापौर पदाच्या आरक्षणाची सोडत जाहीर होणार आहे. त्यात कोणत्या प्रवर्गाचा महापौर मुंबईच्या खुर्चीत विराजमान होणार? हे स्पष्ट होणार आहे. निवडणुकीपूर्वी नगरसेवकांसाठी जाहीर झालेल्या आरक्षणामध्ये २ जागा अनुसूचित जमाती अर्थात एसटी प्रवर्गासाठी राखीव आहेत. त्यानुसार ५३ व १२१ हे २ प्रभाग अनुसूचित जमातीसाठी राखीव ठेवण्यात आले होते. या दोन्ही प्रभागांत सर्वच पक्षांनी उमेदवार दिले. पण दोन्ही ठिकाणी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे उमेदवार विजयी झाले. त्यामुळे आरक्षण सोडतीत महापौर पद एसटीला सुटले तर त्यावर ठाकरे गटाचा उमेदवार बसेल हे निश्चित आहे.

महापालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक ५३ व प्रभाग क्रांक १२१ हे दोन प्रभाग अनुसूचित जमातीसाठी राखीव होते. त्यात प्रभाग क्रमांक ५३ मधून ठाकरे गटाच्या जितेंद्र वळवी यांनी शिंदे गटाच्या अशोक खांडवे यांचा पराभव केला. प्रभाग क्रमांक १२१ मध्येही ठाकरे गटाच्याच प्रियदर्शनी ठाकरे यांचा विजय झाला. त्यांनी शिंदे गटाच्या उमेदवार प्रतिमा खोपडे यांचा पराभव केला. इतर कोणत्याही पक्षाकडे अनुसूचित जमातीचा उमेदवार नाही. त्यामुळे दैवाने साथ दिली तर मुंबई महापालिकेचे महापौर पुन्हा ठाकरे गटाकडे चालत येईल.

उल्लेखनीय बाब म्हणजे उद्धव ठाकरे यांनी दोन दिवसांपूर्वी आपल्या पक्षाच्या नवनिर्वाचित नगरसेवकांशी संवाद साधला. त्यात त्यांनी देवाची इच्छा असेल तर महापौर आपलाच होईल असे विधान केले होते त्यांच्या या विधानाची राज्याच्या राजकीय वर्तुळात खमंग चर्चा रंगली होती. याविषयी अनेक तर्कवितर्क लढवले जात होते. विशेषतः मुंबई महापालिकेत ठाकरे गट व भाजपची युती होणार का? असा प्रश्नही या प्रकरणी उपस्थित केला जात होता.

त्यावर स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना स्पष्टीकरण द्यावे लागले होते. देवाच्या मनात म्हणजे मी नाही. महापौर महायुतीचाच होईल हे वरच्या देवाने ठरवले आहे, असे ते म्हणाले होते. असे असले तरी महापौर पदाच्या आरक्षण सोडतीतच नेमके महापौर पद कोणत्या प्रवर्गाला सुटेल व त्यावर कोण विराजमान होणार हे स्पष्ट होणार आहे.

## संजय राऊतांची आजारपणामुळे बुद्धी भ्रष्ट झाली - प्रकाश महाजनांची टीका



**मुंबई** : महानगरपालिका निवडणुकीच्या निकालानंतर आता सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये शाब्दिक युद्ध पेटले आहे. "शिंदे गट आणि भाजपचे नगरसेवक कैदखान्यात आहेत," या संजय राऊतांच्या टीकेला शिवसेना (शिंदे गट) प्रवक्ते प्रकाश महाजन यांनी अत्यंत जळजळीत भाषेत प्रत्युत्तर दिले आहे. "मुंबई महापालिका हातातून गेल्यामुळे आता 'मातोश्री-2'चा खर्च कसा चालवायचा, ही चिंता ठाकरेंना सतावत आहे." अशा शब्दांत महाजनांनी ठाकरेंच्या आर्थिक नाड्या आवळल्या गेल्याचा टोला लगावला.

संजय राऊत यांनी उपस्थित केलेल्या 'कैदखाना' आणि 'नगरसेवक फोडाफोडी'च्या आरोपांचा समाचार घेताना प्रकाश महाजन म्हणाले की, "संजय राऊत यांची आजारपणामुळे बुद्धी भ्रष्ट झाली आहे. निवडणुकीच्या काळात सर्व नगरसेवकांनी जीवाचे रान केले आहे, त्यामुळे त्यांना एकत्र ठेवले आहे. शिवसेनेचा (शिंदे गट) एकही नगरसेवक फुटणार नाही, उलट ठाकरेंचेच नगरसेवक आमच्या संपर्कात असून ते फुटण्याची दाट शक्यता आहे."

भाजप आणि शिंदे गटात फूट पाडण्याचे प्रयत्न सुरू असल्याचा आरोप फेटाळताना महाजन यांनी उद्धव ठाकरेंच्या भूतकाळातील निर्णयांवर निशाणा साधला. "आम्ही युतीमध्ये निवडणुका लढलो आहोत आणि आम्ही शब्दाचे पक्के आहोत. 2019 मध्ये ज्याप्रमाणे ठाकरेंनी सोबत लढून निकालानंतर दगाफटका केला, तसे आम्ही करत नाही. फडणवीस आणि शिंदे हे दोघे मिळून राज्याच्या आणि युतीच्या हिताचाच निर्णय घेतील," असे त्यांनी ठामपणे सांगितले.

प्रकाश महाजन यांनी एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व महाराष्ट्राने स्वीकारल्याचा दावा केला. ते म्हणाले, "महाराष्ट्रातील जनतेने निकालांच्या माध्यमातून एकनाथ शिंदे यांनाच वंदनीय बाळासाहेब ठाकरेंचा खरा राजकीय वारस म्हणून जाहीर केले आहे. उद्धव ठाकरेंनी स्वतःच्या भावाला (राज ठाकरे) फसवले, त्यामुळे त्यांच्या 65 जागांवरून 6 जागा कशा येतात, हे त्यांनी आधी तपासावे. मीडिया त्यांच्या बाजूने असूनही त्यांना जनतेने बहुमत दिलेले नाही."

मुंबई महापालिकेवरील ठाकरेंची सत्ता संपुष्टात आल्याचा संदर्भ देत महाजन म्हणाले, "फोडाफोडीचे राजकारण त्यांनी करू नये. मुंबईकरांनी त्यांना त्यांची जागा दाखवून दिली आहे. आता पालिकेची सत्ता गेल्यामुळे मातोश्री-2 चे मेंटेनन्स कोण करणार? हा खरा प्रश्न त्यांना पडला आहे."

## तलवार नाचवल्याचा आरोप; शिरसाट प्रकरणावर जलील आक्रमक



**छत्रपती संभाजीनगर** : महापालिका निवडणुकीत विजयी झाल्यानंतर काढण्यात आलेल्या मिरवणुकीत तलवार नाचवल्याप्रकरणी मंत्री संजय शिरसाट यांच्या कन्या हर्षदा शिरसाट यांच्यावर गुन्हा का दाखवण्यात आला नाही? असा सवाल एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, मालेगाव महापालिकेत एकनाथ शिंदे यांच्या पक्षाने एमआयएमचा पाठिंबा मागितल्याचा दावाही त्यांनी यावेळी केला.

राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या कन्या हर्षदा यांचा छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १८ मधून विजयी झाल्या आहेत. त्यांनी निवडणूक निकालानंतर काढण्यात आलेल्या विजयी मिरवणुकीत तलवार नाचवली होती. यासंबंधीचा एक व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल झाला होता. विशेष म्हणजे अशीच तलवार नाचवल्याप्रकरणी शिंदे गटाच्याच अभिजीत जीवनवाल यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. इम्तियाज जलील यांनी या प्रकरणी पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. मिरवणुकीत तलवार नाचवल्याप्रकरणी गरीब नगरसेवकावर गुन्हा दाखल करण्यात आला. पण संजय शिरसाट यांच्या मुलीवर कोणताही गुन्हा दाखल करण्यात आला नाही. कायदा व न्याय श्रीमंतांना वेगळा व गरिबांना वेगळा असतो का? असे ते म्हणालेत.

उल्लेखनीय बाब म्हणजे छत्रपती संभाजीनगर महापालिका निवडणुकीत संजय शिरसाट यांची सिद्धांत व हर्षदा ही दोन्ही मुले विजयी झालेत. सिद्धांत शिरसाट हे प्रभाग क्रमांक २९ अ मधून निवडणुकीच्या रिंगणात होते. त्यांची लढत भाजपचे भगवान गायकवाड व ठाकरे गटाच्या किशोर साबळे यांच्याशी होती. येथील अटीतटीच्या लढतीत सिद्धांत यांचा विजय झाला. दुसरीकडे, हर्षदा शिरसाट या प्रभाग क्रमांक १८ अ मधून महापालिकेच्या रणांगणात होत्या. त्यांचा सामना भाजपच्या मयुरी बर्थने यांच्याशी होता. हर्षदा यांची ही पहिलीच निवडणूक होती. त्यामुळे संजय शिरसाट यांच्यासाठी ही प्रतिष्ठेची निवडणूक बनली होती. दुसरीकडे, इम्तियाज जलील यांनी मालेगाव महापालिकेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने एमआयएमचा पाठिंबा मागितल्याचा दावाही केला आहे. तीन-चार महापालिकेत एमआयएमला अनुकूल परिस्थिती आहे. काँग्रेसने एका ठिकाणी आमचा पाठिंबा मागितला आहे. शिंदे गटानेही मागितला आहे. पण आम्ही त्याला स्पष्ट नकार दिला आहे. आम्ही कोणत्याही परिस्थितीत मालेगावसारख्या ठिकाणी शिंदेसोबत जाार नाही. ते भाजपसोबत सत्तेत आहेत. भाजप व शिंदे गटाला वगळून चांगले अलायन्स करता येत असेल तर त्याचा अहवाल आम्हाला पाठवा अशा सूचना आम्ही आमच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांना दिल्या आहेत, असे ते म्हणालेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २० जानेवारी २०२६


# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमीत्त वक्तृत्व स्पर्धा व युवा सप्ताह संपन्न



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** दि. १९ तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात स्वामी विवेकानंद विचार आणि माँ जिजाऊ यांचे कार्य या अनुषंगाने १२ जानेवारी ते १९ जानेवारी अशा सप्ताहाचे आयोजन आणि मराठी भाषा पंधरवडा निमित्त विविध उपक्रमाचा भाग म्हणून आज वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, यात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला "आधुनिक काळात मराठी भाषेची उपयुक्तता " या विषयावर विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी अत्यंत भरभरून बोलत आपल्या मनातील विचारांना मोकळी वाट करून दिली.दरवर्षी १४ जानेवारी ते २८ जानेवारी या दरम्यान विविध स्पर्धा व उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना मुक्त पणे व्यक्त होण्यासाठी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येते. त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयात भव्य अशा वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्याचबरोबर स्वामी विवेकानंद आणि माँ जिजाऊ यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या विचारांचा वारसा घेऊन युवा सप्ताह साजरा करण्यात येतो.स्वामी विवेकानंदांचे विचार व राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांचे कार्य यावर राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने प्रा.डॉ.उमाकांत सूर्यवंशी यांचे प्रदीर्घ व्याख्यानही यावेळी आयोजित करण्यात आले होते.ते म्हणाले की, स्वामी विवेकानंद यांचा जन्म 12 जानेवारी 1863 साली झाला .ते एक भारतीय तत्त्वज्ञानी व विचारवंत होते.तर्क चिकित्सा करणे हे त्यांचा स्थायीभाव होता. भारतीय दर्शनशास्त्राचा जगाला परिचय करून देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता .19 व्या शतकाच्या उत्तरार्धात हिंदू धर्माला प्रमुख जागतिक धर्माच्या दर्जात आणून आंतरधर्मीय जागरूकता वाढविण्याचे श्रेय विवेकानंदाला दिले जाते. भारतातील हिंदू सुधारणा चळवळीमध्ये ते अग्रस्थानी होते. हिंदू धर्मातील अनिष्ट रूढीवर त्यांनी वेळोवेळी प्रहार केला आहे. विवेकानंद हे त्यांच्या समकालीन भारतातील सर्वात प्रभावशाली तत्त्वज्ञ व समाजसुधारकापैकी एक होते. अनेक तरुणांना प्रभावित करणारा एक जागतिक नेता म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. तेजस्विता, तपसविता व तत्परता हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे गुण होते. माँ जिजाऊ यांच्याविषयी बोलताना त्यांनी त्यांचा आदर्श माता म्हणून उल्लेख केला.राजमाता जिजाऊ या अत्यंत प्रभावशाली व्यक्तींपैकी एक होत्या .काळावर आपला संस्कार सोडणारे काही एक व्यक्तिमत्व असतात ,त्यात राजमाता जिजाऊ ह्या एक होत्या. त्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या नुसत्या माताच नव्हत्या तर त्यांना घडवणाऱ्या एक शिल्पकार म्हणूनही त्यांच्याकडे पाहिले जाते. त्यांनी शिवाजी महाराजांना स्वराज्याची शिकवण दिली आणि त्यांना एक महान शासक बनविण्यासाठी मार्गदर्शन केले .आज त्यांची समाधी रायगडाच्या पायथ्याशी आहे. त्यांच्या या संस्कारामुळेच छत्रपती शिवाजी महाराजांची कारकीर्द अत्यंत लोकप्रिय व मराठी भाषेसाठी उपयुक्त ठरली. शिवाजी महाराज केवळ स्वराज्याचे संरक्षक होते असे नव्हे तर मराठी भाषेचे संवर्धकही होते .त्यांच्या कारकिर्दीमध्येच मराठी शब्दकोश या ग्रंथाची पहिल्यांदा निर्मिती झाली आहे ,हे नाकबूल करून चालणार नाही. शेवटी डॉ.उमाकांत सूर्यवंशी यांनी तरुण विद्यार्थी ,विद्यार्थिनींना त्यांचा आदर्श घेण्याचे आवाहन केले.यावेळी व्यासपीठावर प्रा. प्रसाद बेळंबकर , प्रा. शंकर चव्हाण, प्रा. अरविंद राठोड व स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. डॉ. विनोद धनेराव उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी कुसुमाग्रज,स्वामी विवेकानंद,माँ जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन झाले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ.आशिया चिश्ती यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मेघा जोशी यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रा. नागसेन कांबळे यांनी केल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# शाई पुसली, लोकशाही हरली

बोटावरची शाई पुसली,
मनावरचा डाग न जाई।
मतदान केलं अभिमानानं,
लोकशाहीच लुटल मुळं॥१॥

यंत्रणा विकल्या बाजारात,
न्याय झोपला दारात।
पैसे, दारू, आमिष, साड्या,
मत मोजलं अनीतीत॥२॥

संस्था मोडल्या आतून आत,
विश्वासाचा केला घात।
खोटं खरं बनवलं त्यांनी,
सत्तेच्या खेळात देश उध्वस्त॥३॥

झाडं कापली, पाणी पळवलं,
हवा झाली विषारी।
देवालयं, घरं, माणसं चिरडली,
बुलडोझरांची मस्ती भारी॥४॥

हे फक्त फोडणारे हात,
घडवणं त्यांना कळेना।
सर्जनासाठी लागतो विवेक,
तो लुटारूंना मिळेना॥५॥

पण ऐका लुटारूंनो सावधान,
संयमालाही सीमा असते।
जेंव्हा जनता उभी ठाकते,
तेव्हा सत्ता थरथर कापते॥६॥

शाई जरी स्वच्छ झाली आज,
इतिहास स्वच्छ होणार नाही।
प्रकृती-विध्वंसकांच्या पायाशी,
उद्या काळच उभा राही॥७॥

**प्रभाकर गायकवाड**
छत्रपती संभाजीनगर


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


# सावित्रिबाई फुले कन्या विद्यालयात बीज संकलन स्पर्धा संपन्न



**कन्नड (अरुण थोरात) :** शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांत निसर्ग व पर्यावरणाप्रती प्रेम, जिव्हाळा व आपुलकी वाढीस लागावी. तसेच त्यांच्यात पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण व्हावी यासाठी सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय येथे राष्ट्रीय हरित सेना व सामाजिक वनीकरण विभाग, परिक्षेत्र कार्यालय, कन्नड यांच्या संयुक्त विद्यमाने बीज संकलन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विजेत्या स्पर्धक विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले.विद्यालयातील राष्ट्रीय हरित सेना विभाग प्रमुख पुरुषोत्तम बागुल याप्रसंगी म्हणले की, या स्पर्धेत विद्यालयातील हरित सेनेच्या 40 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. बीज संकलन स्पर्धेतून संकलित झालेल्या बियांचे माती पासून सीड बॉल तयार करून, उन्हाळ्यात सदर सीड बॉल जंगलात तसेच उजाड माळरानावर वर फेकणार असून, त्यातून वृक्षारोपणाचा मानस आहे.यावेळी हरित सेना बीज संकलन स्पर्धेमधील ऋतुजा सुभाष मगर प्रथम क्रमांक, सुभाष संजय मगर द्वितीय क्रमांक, सुवर्णा विनायक राठोड तृतीय क्रमांक, उत्तेजनार्थ पायल रामदास केवट व शेख सरवर अखिल या विजयी विद्यार्थ्यांचा शाळेतर्फे बक्षीस, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. तसेचयावेळी चित्रकला स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र वाटप करून त्यांचे शाळे तर्फे अभिनंदन करण्यात आले. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी अरविंद काटकर, वनरक्षक रुपाली राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती.याप्रसंगी मुख्याध्यापिका सुनीता दळवी, कला शिक्षक सुभाष गोरे, जयश्री सोनार, हरिचंद्र शेवरे, मीनाक्षी पाटील, ज्योती बिरारे, निलेश देशमुख, नारायण पुजरोड, लक्ष्मण चादर, संग्राम देशमुख आदींसह विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन संजय त्रिभुवन यांनी केले तर आभार प्रा. विजय भोसले यांनी मनाले

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २० जानेवारी २०२६


## स्वच्छता अभियान

स्वच्छ करू
आपला परिसर
असावे घरदार
निटनेटके

नको अस्वच्छता
आपल्या शेजारी
दवाखान्याची वारी
टाळू आपण

लावू विल्हेवाट
केरकचऱ्याची
काळजी आरोग्याची
घ्यावी सर्वांनी

प्लास्टिकचा वापर
कायमचा टाळू
नियम सदा पाळू
स्वच्छतेचे

स्वच्छता अभियान
करूया आपण सुरू
वसा हाती धरू
जनहिताचा




- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


# नामविस्तार दिनानिमित्त महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षातर्फे अभिवादन





**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या 32 व्या नामविस्तार दिनानिमित्त महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षातर्फे अभिवादन करण्यात आले यावेळेस सुभेदारी विश्रामगृह ते विद्यापीठ गेट परियंत चारचाकी वाहन रॅली काढण्यात आली तेव्हा शेकडो चार चाकी वाहनांचा रॅलीमध्ये समावेश होता तसेच रॅली द्वारे कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी विद्यापीठ गेट समोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून व मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतर लढ्यात आपल्या प्राणांची आहुती देणारे नामांतर शाहिद यांच्या स्मारकाला पुष्प चक्र अर्पण करून महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे संस्थापक अध्यक्ष संजय भैय्या सोनवणे यांच्या हस्ते अभिवादन केले. या रॅलीचे प्रमुख आकर्षण म्हणजे पक्षाचे संस्थापक अध्यक्ष संजयभैय्या सोनवणे होते व त्यांची या रॅलीला प्रमुख उपस्थिती होती.रॅलीचे नियोजन जिल्हाध्यक्ष राहुल जी .वडमारे यांनी केले होते,रॅलीमध्ये पक्षाचे छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद) जिल्ह्यातील प्रत्येक तालुका व गावातून आलेल्या असंख्य कार्यकर्त्यांनी आपला सहभाग नोंदवला. रॅलीच्या पूर्वी सुभेदारी विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेमध्ये पक्षाचे अध्यक्ष संजयभैय्या सोनवणे यांनी पत्रकारांशी वार्तालाप करताना सांगितले की नामविस्तार झाला म्हणजे सर्व काही संपले असे नाही, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाप्रमाणे विद्यापीठाचा कारभार चालला पाहिजे, विद्यार्थ्यांना सर्व सुख सुविधा मिळायला पाहिजेत व शिक्षणाचा दर्जा उंचावला गेला पाहिजे. मागील तीन वर्षापासून चालू असलेले नामांतर शहीद स्मारकाचे काम दर्जेदार व उच्च प्रतीचे झाले पाहिजे यासाठी आमचे जिल्हाप्रमुख आयु. राहुल जी.वडमारे यांच्या नेतृत्वाखाली आम्ही लवकरच विद्यापीठ प्रशासनाची भेट घेणार असून त्यांच्याशी सविस्तर चर्चा करून या बाबी आम्ही त्यांच्या निदर्शनास आणून देणार आहोत आम्ही सत्ताधारी पक्षाबरोबर असल्याकारणाने काही अडचणी आल्यास आम्ही स्वतः उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याशी याबाबत चर्चा करणार असून येत्या नामविस्तार दिनापर्यंत शहीद स्मारकाचे काम पूर्ण झालेले आपणास दिसेल असेही त्यांनी सांगितले व विद्यापीठ परिसरात काम करत असलेल्या विद्यार्थी नेते, सामाजिक कार्यकर्ते विद्यार्थी यांच्यावर कूलगुरू व विद्यापीठ प्रशासना मार्फत जे गंभीर स्वरूपाचे गून्हे दाखल करण्यात आले आहे ते तात्काळ रद्द करण्यात आले पाहिजे असे सांगितले, याचबरोबर येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये ही आपण महायुती बरोबर काही जागा लढवणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळेस मराठवाड्यातील पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र ही त्यांच्या हस्ते देण्यात आले या कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष राहुल जी .वडमारे, जिल्हा संघटक रतन जाधव, परभणी जिल्हाध्यक्ष माधव हत्तीहंबीरे,बीड जिल्हाध्यक्ष विकास गायकवाड, नांदेड जिल्हा अध्यक्ष ज्ञानोबा ढवळे, संभाजीनगर जिल्हा सचिव रमेश दादा उमप, शहर उपाध्यक्ष संजय चव्हाण, युवा नेते तुषार भोसले, हिरालाल जयस्वाल, महादेव जानकर, बंडू तांदळे , महेंद्रजी जाधव, विकास भाऊ गायकवाड,संजय साबळे, राजेंद्र जाधव, पंकज भुतकर, राजेंद्र सोनवणे, शरद खरात, राहुल जाधव,यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# रोहिणी वाकडे साहित्यदर्शन पुरस्कार प्रदान



**जालना :** जिल्ह्यातील कवी कथाकार नाट्यलेखक डॉ प्रभाकर शेळके यांच्या 'डबल ढोलकी' या बहुचर्चित कथासंग्रहास हा सातवा पुरस्कार कळमनुरी जि हिंगोली येथील स्व.भाव कवयत्री रोहिणी वाकडे साहित्यदर्शन संस्थेच्या वतीने जेष्ठ साहित्यिक प्राचार्य डॉ पंडितराव शिंदेयांच्या शुभहस्ते हा पुरस्कार देण्यात आला जेष्ठ कथाकार प्राचार्य नागनाथ पाटील मुख्य अतिथी श्रीनिवास म्हस्के प्रेरक प्रकाशक दत्ता डांगे,कार्यवाह शंतनु वाकडे जेष्ठ साहित्यिक डॉ जगदिश कदम बालसाहित्यक बबनराव शिंदे, विजय वाकडे,कवी राजाराम बनसकर या मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार देण्यात आला रोख रक्कम व सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.यांच्या या यशाबद्दल गोदा प्रकाशक डॉ दादा गोरे,सुनंदा गोरे, श्रीधर अंभोरे,भारत धपाटे,रमेश देहडकर,रमेश भूतेकर, रामभाऊ शेळके,डॉ विजयकुमार कुमठेकर,दशरथ बुणगे, नामदेव शेळके,रमेश नाईक, भगवान सवळे,कवी कैलास भाले,मनीष पाटीलडॉ शशिकांत पाटील, डॉ राज रणधीर,डॉ सुहास सदावर्ते, डॉ यशवंत सोनुने सय्यद शफीक, अनिरुद्ध पावसे,प्रा जालिंदर बटुळे, अँड विश्वनाथ गायकवाड,पुजा गायकवाड, डॉ दिंगबर दाते,बाबासाहेब माकोडे, रामदास भारुडकर,इ अभिनंदन केले.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २० जानेवारी २०२६


# प्रा. डॉ. संजय गायकवाड यांचा राज्यस्तरीय कविता महोत्सवात विशेष सत्कार



**कन्नड (प्रतिनिधी) :** कन्नड तालुक्यातील लेखक तथा व्याख्याते पिशोर येथील महात्मा फुले कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. डॉ. संजय गायकवाड यांची छत्रपती संभाजीनगर जिल्हा शिक्षक साहित्य संमेलन २०२६ च्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.भाषा, साहित्य, कला व लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक 'तिफण' तर्फे आयोजित सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालयात आठव्या राज्यस्तरीय कविता महोत्सवात हा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. मराठीतील प्रसिद्ध कविवर्य व चित्रपट गीतकार श्री. नारायण सुमंत (सोलापूर) यांच्या शुभहस्ते प्रा. डॉ. गायकवाड यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.यावेळी प्राचार्य डॉ. विजय भोसले, अ‍ॅड. कृष्णा जाधव, डॉ. अंबादास सगट, प्रा. रंगनाथ लहाने, रामकृष्ण पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.'तिफण कविता महोत्सवाचे' संयोजक डॉ. शिवाजी हुसे यांनी प्रा. डॉ. गायकवाड यांचे अभिनंदन करताना, "भाषा, साहित्य व लोकसंस्कृती क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची ही पावती असून त्यांच्या पुढील साहित्यिक वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा," असे उद्गार काढले.या सत्काराबद्दल कवी ज्ञानेश्वर गायके, माधुरी चौधरी, ज्योती सोनवणे, अरुण थोरात, प्रवीण दाभाडे, लक्ष्मण वाल्डे, सुरेश औटे, संदीप वाकडे, केशरचंद राठोड, संदीप ढाकणे, रामेश्वर मोरे, जगन्नाथ जाधव, दत्ता मोरस्कर व मनोज खुटे यांनी प्रा. डॉ. संजय गायकवाड यांचे अभिनंदन केले.कार्यक्रमास साहित्यप्रेमी, कवी, शिक्षक व विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अनिता राठोड यांनी केले, तर आभार युवा कवी व बहुरंगीकार लक्ष्मण वाल्डे यांनी मानले. संपूर्ण समारंभ साहित्यिक व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# शिवाजी महाविद्यालयात स्नेहसंमेलनाचे ज्ञानेश्वर गायके व लक्ष्मण वाल्डे यांच्या हस्ते होणार उदघाटन





**कन्नड (अरुण थोरात) :** येथील शिवाजी महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन दि.20,21 जानेवारी रोजी आयोजित करण्यात आले आहे. या स्नेह संमेलनाचे उदघाटन सकाळी १० वाजता महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी , प्रसिद्ध कवी ज्ञानेश्वर गायके व कवी लक्ष्मण वाल्डे यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मानसिंह पवार हे राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सचिव चंद्रकांतराव देशमुख, उपाध्यक्ष डॉ.पी.के. निकम, कोषाध्यक्ष बाबासाहेब मोहिते, डॉ. भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. ए.के. महाले, गौताळा व्हॅली स्कुलचे अध्यक्ष कृष्णा पा. निकम, संचालक विशाल आहेर यांची उपस्थिती राहणार आहेत. त्यानंतर आनंदनगरी व दुपारी विद्यार्थी कलावंताचा सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न होणार आहे. समारोप व पारितोषिक वितरण ज्युनियर जॉली लिव्हर, मिमिक्री आर्टिस्ट रामेश्वर महाजन भालेराव यांच्या उपस्थितीत होणार असून अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मानसिंह पवार राहतील तर सन्माननिय संस्था पदाधिकारी यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. या स्नेहसंमेलनास विद्यार्थ्यांनी उपस्थित राहुन कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. विजय भोसले, उपप्राचार्य डॉ. बी.के. मगर, प्रभारी प्राध्यापक डॉ. रामचंद्र झाडे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. के. एल. भानुसे, महिला प्रतिनिधी डॉ. प्रतिभा अहिरे, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. उदय डोंगरे, एन.सी . सी. विभाग प्रमुख डॉ. विजय मातकर, एन. एस. एस. प्रमुखडॉ. प्रकाश महाजन यांनी केले आहे.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students

Government Recognised

Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT

X-RAY | C.T.-SCAN

E.C.G. | Radiology

Physiotherapy | Optometry

O. T. TECHNICIAN

PG Radiology

Contact : 9405109103 8830838903


# अब्दिमंडी येथे श्री गणेश जयंती निमित्त ज्ञानेश्वरी पारायण सोहळयाचे आयोजन

**दौलताबाद (जावेद अहमद) :** श्री गणेश जयंती निमित्त अब्दीमंडी (देवगिरी) येथे ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक सोहळा श्री कृपाप्रसाद गणपती मंदिर, अब्दीमंडी, देवगिरी ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे मोठ्या भक्तिभावात साजरा होणार आहे.या ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे व्यासपीठ चालक ह.भ.प. श्री आप्पा महाराज सानर्डकर (आंबी बाची) हे आहेत. सोहळ्याचा प्रारंभ पौष कृ. १२, शके १९४७, शुक्रवार दि. १६ जानेवारी २०२६ रोजी होणार असून सांगता माघ शु. ३, शके १९४७, गुरुवार दि. २२ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे.सांगता कार्यक्रमाच्या दिवशी गुरुवार दि. २२ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. श्री पांडुरंग महाराज वाघ (देवगिरी) यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. कीर्तनानंतर दादासाहेब म्हस्के पाटील यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून महाप्रसादाने या कार्यक्रमाची सांगता होणार आहे.या पवित्र ज्ञानामृताचा लाभ घेण्यासाठी सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समस्त गावकरी मंडळी, अब्दीमंडी यांच्या वतीने करण्यात आले आहे.


जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २० जानेवारी २०२६

## विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेत विविध स्पर्धा व उपक्रम गरजेचे - प्रवीण शिंदे



**कन्नड** : येथील मदर गंगा इंग्लिश स्कूल शाळेत दिनांक १९ जानेवारी रोजी क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले सदरील स्पर्धा या दिनांक १९ जानेवारी ते २१ जानेवारीदरम्यान घेतल्या जाणार असून यामध्ये कबड्डी, खो- खो, धावन्याची शर्यत, अशा प्रकारच्या मैदानी खेळांचा तसेच बुद्धिबळ, कॅरम, लुडो यासारख्या बैठ्या खेळांची समावेश करण्यात येणार आहे. यावेळी उद्घाटनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून तालुका क्रीडा संकुल समिती सदस्य व मार्गदर्शक प्रवीण शिंदे यांना आमंत्रित करण्यात आले यावेळी साने गुरुजी माध्यमिक विद्यालयाचे जस्ट शिक्षक रवींद्र जाधव उपस्थित होते होते. सदरील कार्यक्रमासाठी शाळेचे अध्यक्ष डॉ. श्री. अण्णासाहेब शिंदे, सचिव श्री. संदीप शिंदे शाळेचे प्राचार्य श्री. श्रीकांत झिंजुर्डे, उपस्थित होते.सदरील स्पर्धेच्या यशस्वितेसाठी श्री. उदय सोनवणे , श्रीमती. दुर्गा काळे, शुभांगी पठाडे, योगिता जाधव, रूपाली शेजवळ, वर्षा निकम, गीता पठाडे, धीरज राठोड, अनिकेत गोंडे, जयश्री वाडिले, छाया हिंगे, इशिता शर्मा,शितल पाटील, प्रियंका छत्रे, मिनाक्षी नलावडे, पुजा पवार, अश्विनी राठोड,ज्योती मालकर,कोमल गौर,इत्यादींनी परिश्रम घेतले.

## नगसेवकांना ज्याची प्रतीक्षा, त्याची तारीख अन् वेळ ठरली

**मुंबई** : राज्यातील २९ महानगरपालिकांमधील महापौर पदाच्या आरक्षणासंदर्भात महत्त्वाची हालचाल सुरू झाली असून, या विषयावर तोडगा काढण्यासाठी आणि आरक्षण ठरवण्यासाठी नगरविकास विभागाकडून उच्चस्तरीय बैठक बोलावण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने याबाबत अधिकृत पत्रक जारी केले असून, ही बैठक २२ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता मंत्रालयात होणार आहे. या बैठकीचे अध्यक्षस्थान राज्याचे नगरविकास मंत्री भूषवणार आहेत.

शासनाच्या या पत्रानुसार, राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये महापौर पदासाठी आरक्षण निश्चित करण्याबाबत सध्या निर्माण झालेल्या पेचावर चर्चा करण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. मंत्रालयातील परिषद सभागृहात, सहाव्या मजल्यावर ही बैठक पार पडणार असून, त्यामध्ये संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती अपेक्षित आहे. महापौर पदाचे आरक्षण हे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सत्तास्थापनेसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळे या बैठकीत आरक्षण सोडत काय निघते, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

नगरविकास विभागाच्या उपसचिव अनिरुद्ध जेवळीकर यांनी हे पत्र जारी केले असून, त्यात स्पष्ट करण्यात आले आहे की, आरक्षण निश्चितीचा निर्णय नगरविकास मंत्र्यांच्या निर्देशानुसार घेतला जाणार आहे. या बैठकीत होणाऱ्या चर्चेनंतर महापौर पदाच्या आरक्षणाबाबत अंतिम सोडत काढली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या महापालिका सत्तास्थापनेसाठी हा निर्णय निर्णायक ठरणार आहे.

या पत्राची प्रत मुख्यमंत्री कार्यालय, उपमुख्यमंत्री कार्यालय, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव तसेच संबंधित वरिष्ठ सचिवांना देण्यात आली आहे. यावरून राज्य सरकार या विषयाकडे किती गांभीर्याने पाहत आहे, हे स्पष्ट होते. महापालिका निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर अनेक शहरांमध्ये महापौर पदाच्या आरक्षणावरून राजकीय चर्चा आणि मतभेद निर्माण झाले आहेत. अशा पार्श्वभूमीवर ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

राज्यातील महापालिकांमध्ये सत्तास्थापना, महापौर निवड आणि पुढील प्रशासकीय निर्णय यासाठी आरक्षण निश्चित होणे आवश्यक असते. त्यामुळे या बैठकीतून निघणारा निर्णय केवळ प्रशासकीय नव्हे, तर राजकीय दृष्ट्याही महत्त्वाचा ठरणार आहे. गुरुवारी होणाऱ्या या बैठकीकडे सर्व राजकीय पक्षांचे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे लक्ष लागून राहिले आहे.

# श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूल, चापानेर येथे हळदी-कुंकू समारंभ उत्साहात



**चापानेर** : येथील श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूल येथे महिलांच्या सन्मानाचा, परंपरेचा आणि आपुलकीचा प्रतीक असलेला हळदी-कुंकू समारंभ अत्यंत आनंदी व उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. मराठमोळ्या संस्कृतीचे जतन आणि सामाजिक एकोपा वाढवण्याच्या उद्देशाने हा समारंभ शाळेच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीस उपस्थित महिलांचे पारंपरिक पद्धतीने हळदी-कुंकू लावून, फुलांच्या हारांनी व प्रेमळ स्वागताने अभिनंदन करण्यात आले. शाळेचा परिसर रांगोळी, फुलांची सजावट व आकर्षक मांडणीने नटला होता. महिलांनी पारंपरिक वेशभूषेत मोठ्या उत्साहाने सहभाग घेत कार्यक्रमाची शोभा वाढवली. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका व शिक्षकवृंद यांनी महिलांचे समाजातील स्थान, कुटुंबातील त्यांचे मोलाचे योगदान तसेच भारतीय संस्कृती जपण्याचे महत्त्व यावर मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले. अशा उपक्रमांमुळे शाळा व पालक यांच्यातील नाते अधिक दृढ होते, असे मतही व्यक्त करण्यात आले.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व महिलांना स्नेहभेट देण्यात आली. आपुलकी, सौहार्द आणि परंपरेचा संगम असलेला हा हळदी-कुंकू समारंभ उपस्थित महिलांच्या मनात आनंददायी आठवणी निर्माण करून गेला.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे व्यवस्थापन, शिक्षकवृंद व सहकार्य करणाऱ्या सर्व सदस्यांचे विशेष योगदान लाभले. श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूल, चापानेर येथे साजरा झालेला हा हळदी-कुंकू समारंभ महिलांसाठी एक अविस्मरणीय व प्रेरणादायी अनुभव ठरला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थाध्यक्ष दशरथ सोमासे सर, प्राचार्य कौशल्या सोमासे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील शिक्षक व कर्मचारी वृंद:संदीप वाकडे, वर्षा जाधव, भारती पवार, मनिषा पवार, आकांक्षा वैष्णव, दुर्गा वैष्णव, अभिलाषा वारखिंडे, दिव्या लोखंडे, पूजा लोखंडे, अंकुश राठोड, राजू राठोड आणि कविता हिरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

